राज्यातील पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी निधी वितरीत करण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

## गृह विभाग

## शासन निर्णय क्रमांकः सीसीटीव्ही३६२४-/प्र.क्र.१३०/भाग६-/ई-८४१५८४/पोल-३

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २१.५.२०२६

<u>वाचा</u> :-

१. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे क्रिमिनल रिट पिटीशन क्र.२११०/२०१४ वरील दि.१३.०८.२०१४, दि.२१.१०.२०१५, दि.२४.०२.२०१६, दि.२१.०९.२०१६ व दि.३०.११.२०१६ रोजीचे आदेश.
२. मा. सर्वोच्च न्यायालयाचे क्रिमीनल रिट पिटीशन क्र.५३९/१९८६वरील दि.२४.७.२०१५रोजीचा न्यायनिर्णय.
३. सचिव, माहिती तंत्रज्ञान संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र.संकीर्ण-२०१२/प्र.क्र.३७/१८, दि.०४.०३.२०१३.
४. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/२१/७२७२/न्या.प्र. सीसीटीव्ही/२०३/२०१४, दि.२७.०१.२०१५.
५. शासन निर्णय़, गृह विभाग क्र. सीसीटी-३६१५/प्र.क्र.१३०/पोल-३, दि.२३.११.२०१५.
६. शासन निर्णय, उदयोग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उदयोग-४, दि.३०.१०.२०१५ व दि.०१.१२.२०१६.
७. शासन निर्णय, सामान्य प्रशासन (माहिती व तंत्रज्ञान) विभाग क्र. मातंसं-१७१६-३६१५/प्र.क्र.२८६/३९, दिनांक ०९.०८.२०१६.
८. शासन निर्णय़, गृह विभाग क्र.सीसीटी-३६१५/प्र.क्र.१३०/भाग-१/पोल-३, दि.०६.०१.२०१७.
९. शासन निर्णय़, गृह विभाग क्र.सीसीटी-३६१५/प्र.क्र.१३०/पोल-३, दिनांक २६.०३.२०१८.
१०. महा-आयटी कॅार्पोरेशनचे पत्र क्र.MahaIT/PRJ/०३९/०१/२०१८, दि.२४.०७.२०१९.
११. शासन निर्णय़, गृह विभाग क्र.सीसीटी-३६१५/प्र.क्र.१३०/पोल-३, दिनांक १४.११.२०१९.
१२. शासन निर्णय़, गृह विभाग क्र.सीसीटी-३६१५/प्र.क्र.१३०/पोल-३, दिनांक ११.१२.२०१९.
१३. शासन निर्णय, गृह विभाग क्र. सीसीटी-३६१५/प्र.क्र.१३०/भाग-३/पोल-३, दि.१७.०१.२०२२.
१४. शासन निर्णय, गृह विभाग क्र. सीसीटी-३६१५/प्र.क्र.१३०/भाग-३/पोल-३, दि.४.१०.२०२२.
१५. शासन निर्णय, गृह विभाग क्र. सीसीटी-३६१५/प्र.क्र.१३०/भाग-२/पोल-३, दि.३.११.२०२२.
१६. शासन निर्णय, गृह विभाग क्र. सीसीटी-३६१५/प्र.क्र.१३०/भाग-२/पोल-३, दि.२८.८.२०२३.
१७. शासन निर्णय क्रमांकः सीसीटीव्ही-३६२४ /प्र.क्र.१३०/भाग-६/ई-८४१५८४/पोल-३, दि.१७.१२.२०२४ व दि.३१.३.२०२५ व १९.५.२०२५
१८.मे.जावी सिस्टिम इंडिया प्रा. लि. यांची दि.१५.१२.२०२५, दि.१६.१२.२०२५, दि.१७.१.२०२६, रोजीची देयके.
१९. मे. प्राईसवॉटरहाऊस कूपर्स कंपनी यांचे पोमसं कार्यालयाने देयकासोबत जोडलेले अहवाल.
२०. अपर पोलीस महासंचालक (नि. व स.), पोलीस महासंचालक कार्यालय, मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/१७/६१६२/पो.ठाणे सीसीटीव्ही प्रकल्प/७७/२०२२-२६, दि.१६.३.२०२६. व १८.३.२०२६.
२१. वित्त विभाग,शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि.९.४.२०२५.

**प्रस्तावना :-**

लिओनार्ड झेविअर वल्दारीस व इतर यांनी महाराष्ट्र शासन व इतर यांचेविरुध्द मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे क्रिमिनल रिट पिटीशन क्र.२११०/२०१४ दाखल केली आहे. मा. उच्च न्यायालयाने विषयांकीत याचिकेमध्ये दि.१३.०८.२०१४, दि.२४.०२.२०१६ व दि.३०.११.२०१६ रोजी आदेश पारित केले आहेत. मा. मुंबई उच्च न्यायालयाने पोलीस कोठडीतील मृत्यु रोखण्यासाठी राज्यातील प्रत्येक पोलीस ठाण्यांमधील प्रत्येक कॉरीडॉर, रुम व लॉकअप यामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत आदेशित केले आहे. तसेच डि.के.बसू व इतर यांनी मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये पश्चिम बंगाल राज्य आणि इतर यांचेविरुध्द क्रिमीनल रिट पिटीशन क्र.५३९/१९८६ या प्रकरणी दि.२४.०७.२०१५ रोजी निर्णय दिला आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाने संवेदनशील पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही बसविणेबाबत निदेश दिलेले आहेत. ही बाब विचारात घेवून प्रायोगिक तत्वावर पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे अधीनस्त २५ पोलीस ठाण्यांमधील चार्ज रुम, लॉकअप, मार्गिका, स्टेशन हाऊस इ. पाच ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत उपरोक्त संदर्भाधिन क्र.५ येथे नमूद दिनांक २३.११.२०१५ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकिय मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार सर्व २५ पोलीस ठाण्यांमध्ये आदेशात नमूद ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची प्रक्रिया पुर्ण झाली आहे.

मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार राज्यातील सर्व पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही बसविण्याबाबत उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या दि.२७.०२.२०१८ रोजीच्या बैठकीत रु.७२.६० कोटी खर्चास मान्यता देण्याबाबतची शिफारस करण्यात आली होती, त्यानुषंगाने शासन निर्णय, गृह विभाग दि.२६.०३.२०१८ नुसार रु.७२.६० कोटी खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली. तसेच सदर पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही बसविण्याची कार्यवाही महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळामार्फत करण्यात यावी, असा निर्णय घेण्यात आला होता.

उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या दि.१३.११.२०१९ रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार संदर्भ क्र.११ येथील दि.१४.११.२०१९ शासन निर्णयाअन्वये राज्यातील सर्व पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी येणाऱ्या रु.११० कोटी (सर्व कर व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळाच्या सेवाशुल्कासह) एवढया सुधारित खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. तसेच संदर्भाधिन क्र.१२ येथे नमूद दि.११.१२.२०१९ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील सर्व पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे काम हे महाराष्ट्र माहिती व तंत्रज्ञान महामंडळामार्फत न करता पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्यामार्फत करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

राज्यातील एकूण १०८९ पोलीस ठाण्यांपैकी मे. जावी सिस्टिम इंडिया प्रा. लि. यांनी झोन क्र.३, मधील एकूण २९७ पोलीस ठाण्यांपैकी १५० पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवून ५०% काम पूर्ण केल्यामुळे संदर्भाधिन क्र.१३ येथे नमूद दिनांक १७.०१.२०२२ च्या शासन निर्णयान्वये पुरवठादार मे. जावी सिस्टिम इंडिया प्रा. लि. यांना रु.५,८९,६२,२२६/- (जीएसटी सह) इतकी रक्कम अदा करण्यात आली आहे. तदनंतर संदर्भाधिन क्र.१४ येथे नमूद दिनांक ४.१०.२०२२ च्या शासन निर्णयान्वये पुरवठादार मे. जावी सिस्टीम इंडिया प्रा.लि. यांना रु. १,७६,०९,४३८/- (जीएसटीसह) इतकी रक्कम अदा करण्यात आली आहे.

तदनंतर संदर्भाधिन क्र.१५ येथे नमूद दिनांक ३.११.२०२२ च्या शासन निर्णयान्वये पुरवठादार मे. जावी सिस्टिम इंडिया प्रा. लि. यांना रु.४,४५,२९,६९९/- (जीएसटी सह) इतकी रक्कम अदा करण्यात आली आहे. तदनंतर संदर्भाधिन क्र.१६ येथे नमूद दिनांक २८.८.२०२३ च्या शासन निर्णयान्वये पुरवठादार मे.जावी सिस्टिम इंडिया प्रा. लि. यांना रु.२,४४,९६,९०३/- (जीएसटी सह) इतकी रक्कम अदा करण्यात आली आहे. तदनंतर संदर्भाधिन क्र.१७ येथे नमूद दि.१७.१२.२०२४.च्या शासन निर्णयान्वये पुरवठादार मे.जावी सिस्टिम इंडिया प्रा. लि. यांना रु.२७,३४,७२३.०० (जीएसटीसह) इतकी रक्कम अदा करण्यात आली आहे. तदनंतर संदर्भाधिन क्र.१७ येथे नमूद दि.१९.५.२०२५.च्या शासन निर्णयान्वये पुरवठादार मे.जावी सिस्टिम इंडिया प्रा. लि. यांना रु.१८,४७,३९९.०० (जीएसटीसह) इतकी रक्कम अदा करण्यात आली आहे.

२. राज्यातील एकूण १०८९ पोलीस ठाण्यांपैकी मे. जावी सिस्टीम्स इंडिया प्रा. लि. यांनी सीसीटीव्ही बसविण्याचे काम केल्याबद्दल आजअखेर देयके अदा करण्यात आली त्याचा तपशील पुढीलप्रमाणे-

| अ.क्र. | शासन निर्णयाचा दिनांक | वितरीत केलेली रक्कम. |
|---|---|---|
| १ | १७.१.२०२२ | ५,८९,६२,२२६.०० |
| २ | ४.१०.२०२२ | १,७६,०९,४३८.०० |
| ३ | ३.११.२०२२ | ४,४५,२९,६९९.०० |
| ४ | २८.८.२०२३ | २,४४,९६,९०३.०० |
| ५ | १७.१२.२०२४ | २७,२३,७३४.०० |
| ६ | १९.५.२०२५ | १८,४७,३९९.०० |
| | **एकूण :** | **३९,९०,०२,१०३.००** |

आता, अपर पोलीस महासंचालक (नि.व स.) पोलीस महासंचालक कार्यालय, मुंबई यांच्या दि.१६.३.२०२६ व तदद्वनंतर दि.१८.३.२०२६ रोजीच्या पत्रान्वये मे.जावी सिस्टीम इंडिया प्रा.लि. यांनी प्रकल्पांतर्गत औरंगाबाद (झोन ३), नांदेड (झोन ४) व कोकण (झोन ७) या विभागाकरिता OPEX Phase Invoices for Quarter 7 to 10 (December 2024 –November 2025) ची देयके सादर केली असून प्रकल्प सल्लागार M/s. PWC Ltd. यांनी सदरचे देयकांवर Payment Note सादर केली असल्याचे नमूद केले आहे. पोलीस ठाणे सीसीटीव्ही प्रकल्पांकरिता स्थापन करण्यात आलेल्या मध्यवर्ती प्रकल्प सल्लागार समितीने सदरची देयके तपासून अहवाल सादर केला आहे. याकरिता सादर केलेल्या देयकाची एकूण रु.८०,९८,६३७/- इतक्या रकमेची देयके अदा करण्याकरीता प्रशासकीय मान्यता देऊन आवश्यक निधी बीडीएस प्रणालीवर तात्काळ उपलब्ध करून देण्याबाबत कळविले आहे.

बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार मे.जावी सिस्टिम इंडिया प्रा.लि. यांचे औरंगाबाद (झोन ३), नांदेड (झोन ४) व कोकण (झोन ७) या विभागाकरिता OPEX Phase Invoices for Quarter 7 ते Quarter 10 (December 2024 to November 2025) च्या कालावधीत केलेल्या कामाच्या देयकाची undisputed amount वर सद्यस्थितीत पुढील कार्यवाही करून मध्यवती प्रकल्प सल्लागार समितीच्या अहवालाप्रमाणे देयके अदा करण्यात याची असा निर्णय घेण्यात आला आहे. सदर निर्णयानुसार देयकांची undisputed amount चा मध्यवती प्रकल्प सल्लागार समितीच्या अहवालाप्रमाणे व वरील नमुद केलेल्या प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या निर्णयानुसार प्रत्येक झोनप्रमाणे देयकाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| क्र. | देयकांचा तपशील | देयकांचा कालावधी. | देयकाची रक्कम |
|---|---|---|---|
| १ | पोलीस स्टेशन सीसीटीव्ही प्रकल्प पुरवठादार मे. जावी सिस्टींम्स इंडिया प्रा.लि. यांचे OPEX AMC Invoices for Quarter 7 | माहे डिसेंबर २०२४ ते फेब्रुवारी २०२५ | १७,५७,७८५/- |
| २ | पोलीस स्टेशन सीसीटीव्ही प्रकल्प पुरवठादार मे. जावी सिस्टींम्स इंडिया प्रा.लि. यांचे OPEX AMC Invoices for Quarter 8 | माहे मार्च २०२५ ते मे २०२५ | २१,५५,४४५/- |
| ३ | पोलीस स्टेशन सीसीटीव्ही प्रकल्प पुरवठादार मे. जावी सिस्टींम्स इंडिया प्रा.लि. यांचे OPEX AMC Invoices for Quarter 9 | माहे जून २०२५ ते ऑगस्ट २०२५ | २०,१०,६९३/- |
| ४ | पोलीस स्टेशन सीसीटीव्ही प्रकल्प पुरवठादार मे. जावी सिस्टींम्स इंडिया प्रा.लि. यांचे OPEX AMC Invoices for Quarter 10 | माहे सप्टेंबर २०२५ ते नोव्हेंबर २०२५ | २१,७४,७१३/- |
| | **एकूण :- (क्वार्टर 7 ते क्वार्टर 10)** | | ८०,९८,६३७/- |

त्यानुसार सीसीटीव्ही प्रकल्पाचे पुरवठादार मे.जावी सिस्टीम इंडिया प्रा.लि. यांनी OPEX Phase Invoices for Quarter ७ ते Quarter १० (December २०२४ to November २०२५) च्या कालावधीत औरंगाबाद (झोन ३), नांदेड (झोन ४) व कोकण (झोन ७) या विभागाकरिता मध्ये केलेल्या कामाकरीता सादर केलेल्या देयकाची एकूण रक्कम रूपये ८०,९८,६३७/- (जीएसटी सह) (अक्षरी रुपये ऐंशी लाख अठ्ठ्याण्णव हजार सहाशे सदतीस फक्त) अदा सन २०२६-२७ या वित्तीय वर्षात अदा करण्याची विनंती विचारात घेता त्यानुषंगाने शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :-**

राज्यातील पोलीस ठाण्यांमध्ये मा.न्यायालयाच्या आदेशानुसार सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी प्रकल्पाचे पुरवठादार मे.जावी सिस्टीम इंडिया प्रा.लि. यांनी OPEX Phase Invoices for Quarter 7 ते Quarter 10 (December 2024 to November 2025) च्या कालावधीत झोन-३ औरंगाबाद, नांदेड झोन-४, कोकण झोन-७ मध्ये केलेल्या कामाकरीता सादर केलेल्या देयकाची एकूण रक्कम रूपये ८०,९८,६३७/- (जीएसटी सह) (अक्षरी रुपये ऐंशी लाख अठ्ठ्याण्णव हजार सहाशे सदतीस फक्त) इतकी देय रक्कम वितरीत करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

२. सदर रक्कमेची देयके अदा करतांना आयकर व अंमलात असलेले कर वजाती करुन अदा करण्यात यावी.

३. प्रस्तुत प्रकरणी उपरोक्त प्रमाणे होणारा खर्च हा "मागणी क्र.बी-१०, ४०५५ - पोलीस यावरील भांडवली खर्च, ८०० इतर खर्च, (००) (०९) सीसीटीव्ही संनियंत्रण यंत्रणा बसविणे (४०५५ ०२२३) या अंतर्गत ५२-यंत्रसामग्री व साधनसामग्री" या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो सन २०२६-२०२७ या वित्तीय वर्षासाठी उपलब्ध असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

४. सदर निधी कोषागारातून आहरित करण्यासाठी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना नियंत्रण अधिकारी व त्यांच्या अधिनस्त आहरण व संवितरण अधिकाऱ्याला आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषीत करण्यात आले आहे.

५. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.१८.४.२०१७ ला अनुसरुन प्रशासकीय विभागांना असलेल्या अधिकारान्वये तसेच वित्त विभागाचा शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/ विनियम, भाग-२, दि.१७.४.२०१५ मधील वित्तीय अधिकार, नियम पुस्तिका, १९७८ भाग- पहिला, उपविभाग-दोन, महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम,१९६५ अन्वये प्रशासकीय विभागाला प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारान्वये तसेच वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३,दि.९.४.२०२५ अनुसार सन २०२६-२७ या वित्तीय वर्षाच्या अनिवार्य व कार्यक्रमांतर्गत खर्चाचा अर्थसंकल्पित निधी वितरणास दिलेल्या मान्यतेस अनुसरुन वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.३४३/२०२६/व्यय-७ दि.१३.४.२०२६ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०५२११५१४४९५९२९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by AJIT MALHARI KAWADE
Date: 2026.05.21 15:16:38 +05'30'

**(अजित म. कवडे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव,राजभवन,मुंबई.
२. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
३. अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. प्रधान सचिव, माहिती तंत्रज्ञान, मंत्रालय, मुंबई.
८. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
९. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
१०. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
११. अधिदान व लेखा अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१२. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१३. मे.जावी सिस्टिम इंडिया प्रा.लि.,दुसरा मजला,ऑफिस क्र.२०४,जे.के.चेम्बर्स,सीटीएस क्र.१४३०, शुक्रवार पेठ, पुणे-४११००२.
१४. मे. प्राईसवॉटर हाऊस कूपर्स लि., २५२, वीर सावरकर मार्ग, दादर (पश्चिम), मुंबई-४०००२८.
१५. वित्त विभाग (व्यय-७/वित्तीय सुधारणा) मंत्रालय, मुंबई-३२.
१६. सहसचिव, (पोल-१४) गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१७. निवडनस्ती,पोल-३.